दिनांक - ३०/०८/८५

संस्कृतदिनाच्या निमित्ताने येथील शाळेत येण्याचा योग आला.मुले शिस्तप्रिय आणि उत्साही दिसली त्यांच्याशी बोलताना आनंद वाटला.आज लहान भासणारी शाळा थोड्याच वर्षात मोठ्या हायस्कूलात रुपांतरीत होईल असा बळकट विश्वास वाटतो.शाळेला सुयश चिंतितो.

**- मा.श्री. एम्.एन्,जोशी.**

दिनांक - २२/०१/८६

लोकमान्य टिळक विद्यामंदिराच्या रुपानें चिखलगावच्या खडकाळ परिसरात नंदनवन फुलविण्याचा प्रयत्न पाहून खरोखर समाधान वाटले.खऱ्या अर्थाने हा एक भगीरथ प्रयत्न आहे.लोकमान्य टिळकांच्या जन्मभूमींत अशा प्रकारच्या प्रकल्पाच्या रुपाने त्यांचे जिवंत स्मारक उभारणें हेंच त्यांचे यथार्थ स्मारक होईल.

**- मा.श्री.ग.य.दिक्षित.**

दिनांक - ३१/०३/८६

चिखलगाव येथे श्री व श्रीमती दांडेकर यांनी चालविलेली शाळा व स्वतःचे शेती फार्म ही सर्व श्री.भाऊराव पाटील यांनी ज्या तत्वानुसार (म्हणजे उध्दरेल आत्मनात्मानम) शाळा काढल्या त्याच तत्वानुसार स्वावलंबी शिक्षण व उत्पादन व व्यवसाईक शिक्षण हे कौतुकास्पद आहे.येथे जिद्द आहे तेव्हा यश हे येणारच; नव्हे तर हा आदर्श इतरांनाही उपयोगी पडेल.या कार्यकर्त्यांना जे निराशेचे प्रसंग येतील त्यापासून निभाऊन जाण्याची शक्ती परमेश्वराने द्यावी हीच प्रार्थना.

**- मा.श्री.म.बेहरे**

दिनांक - १८/१२/८७

एका कातळावर एक शाळा उमललेय! या शाळेतील मुलं खूप शिकून ,खूप काम करुन आत्मविश्वासाने उभी राहोत.

**- मा.श्री.विलास चाफेकर.**

दिनांक - २०/०१/८८

पायाचा दगड होणें कठिण असते.कातळावर इमारत उभारणे त्याहून कठिण.त्याचा पाया खोदण्याचे अविश्रीत श्रम आणि त्या श्रम साफल्याचा आनंद उपभोगणे यातली जाण फारच थोड्याना. पण ही जाण घेऊन आज इथे जे उणे राहत आहे हे पाहून शब्द अपुरे पडत आहेत.म.लोकमान्य टिळकांच्या जन्मभूमीत हा अपूर्वोत्सव उभा राहत आहे.यामुळें जर जिथे पिकते तिथे विकत नाही. ही म्हण खोटी पडत आहे.या मुलांना फुलू द्या आणि या कातळावर छान फुल आणि फलोद्यान फुलू द्या.यात यश निश्चितच येणार यात काय शंका. क्षणभर बोलून , बघून लिहिणे सोपे आहे.हे पटले पण मनापासून काहीतरी वाटले,पटले हे मात्र खरच.

**- मा.श्रीमती. पदमाताई घारपुरे.**

चिखलगाव माध्यमिक शाळेला आज भेट देण्याचा योग आला.शेतकऱ्यांचे कर्ज मुक्ती आंदोलनाचे निमित्ताने या भागात आलो होतो.चिखलगाव ह्या लोकमान्य टिळक यांचे मूळ गावी ही शाळा चालू आहे.सौ. दांडेकर मुख्याध्यापिका यांनी खेडेगावी राहून खडकाळ माळावर मुलांना शिक्षणाचे दृष्टीने चांगल्या सुविधा मिळवून दिल्या आहेत.सभोवारच्या अनेक गावांना व तेथील मुलांना ह्या शाळेतून चांगले सुसंस्कार मिळावे अशी अपेक्षा करतो.शाळेचे शिक्षकांनी एकजुटीने काम केल्याने चांगले काम होऊ शकते हे येथील शिक्षकांनी दाखवून दिले आहे.त्याबद्दल सर्व शिक्षकांना धन्यवाद!

**- मा.श्री. श्रीधर नातू**

दिनांक - १६/०२/८८

आज रोजी सदर शाळेला भेट दिली.या पंचक्रोशीच्या दृष्टीने हायस्कूलची नितांत गरज असल्याचे समजले.सदर हायस्कूलला ज्या संस्थांकडून सहकार्य लाभले आहे त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच.शाळेच्या मुख्याध्यापिका यांनी अनेक योजना व उपक्रम यांची माहिती सांगितली.या भेटीच्या नि मित्ताने विद्यामंदिरातील विद्यार्थी , शिक्षक यांना धन्यवाद! हायस्कूलची उतरोत्तर प्रगती होवो ही शुभेच्छा!

**- मा.श्री. शिवाजीराव गोताड, माजी आमदार रत्नागिरी**

आज अकल्पितपणे शाळेला भेट देण्याचा योग आला. दांडेकर दांम्पत्याच्या ध्येयवादाबद्दल बरंचसं ऐकल होतं.प्रतिकूलतेच्या खडकावर नवनिर्माणाची त्यांची व त्यांच्या सहकाऱ्यांची जिद्द आज प्रत्यक्ष पाहिली,अनुभवली.लोकमान्यांच्या पावन जन्मभूमीत हा ध्येयवाद फुलो,फळो बहरो व या भागातील उपेक्षितांची जीवनेही त्याबरोबरच फुलोत,फळोत,बहरोत अशी सदिच्छा!

**- मा.श्री.हरीश्चंद्र गीते**
**सदस्य महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,मुंबई विभागीय मंडळ**

दिनांक - १३/०१/१९८९

आज ता.१३/०१/१९८९ रोजी लोकमान्य टिळक विद्यामंदिर,चिखलगाव या माध्यमिक शाळेला भेट देण्याचा योग आला.शाळेची वाटचाल पाहून तसेच शाळेची प्रगती पाहून समाधान वाटले.मुख्याध्यापिका आणि त्यांचे सहकारी यांना धन्यवाद!

**- मा.श्री.ल.र.हातणकर, संपर्क मंत्री**

दिनांक - २८/०१/१९८९

ओसाड माळरानावर लोकमान्य टिळक विद्यामंदिर चालविणे हा एक आपण चालविलेला महायज्ञ आहे.ह्या यज्ञातून लोकमान्य टिळकांप्रमाणे आणि ज्ञानेश्वरांप्रमाणे विचारवंत निर्माण व्हावेत हीच परमेश्वर चरणी प्रार्थना.

**- मा.श्री.अप्पा गुडघेकर,शिवसेना तालुका संघटक**

आजपर्यंत वेगवेगळ्या मोठ्या सामाजिक संस्थांना भेटी देण्याचा योग आला होता.परंतु आज या शाळेला,विद्यार्थ्यांना सरांना भेटून मनापासून आनंद झाला.आणि इतके कठिण काम,अनंत अडचणी असूनसुध्दा चिकाटीने,जिद्दीने सुरु असलेले पाहून मन भरुन आले. हार्दीक शुभेच्छा!

**- मा.श्रीमती.सविता प्रभुणे आणि मा.श्रीमती. स्मिता तळवळकर.**

दिनांक - ८/१२/८९

## कृती पाहिजे बडबड नको

आज शाळेस भेट देणेस आनंद वाटला.दगडावर दगड रचून इमारत तयार होते त्याप्रमाणे ज्ञानाने माणसाचे आयुष्य तयार होते.ते मनुष्य घडवण्याचे आणि बांधणेचे काम ही संस्था करीत आहे.या बद्दल धन्यवाद!

- **मा.श्री.के.गो.लिमये, पाली,सुधागड रायगड.**

चिखलगाव हे लोकमान्य टिळकांचे गाव हे डॉ.दांडेकरांनी सांगितल्यावरच ठाऊक झाले.इतिहासाच्या पुस्तकात चिखली हे लोकमान्य टिळकांचे गाव असल्याचे लहापणापासून वाचत आलो असल्याने आश्चर्य वाटले.चिखलगावची इतिहासाने केलेली उपेक्षा वर्तमानानेही पुढे चालू ठेवल्याचे गावात फिरताना जाणवले.

बऱ्याचशा सुविधांपासून दूर असणाऱ्या व सर्वार्थानी अपेक्षित अशा या चिखलगावात दांडेकर दांम्पत्याने ही शाळा उभारली आहे.आणि तिच्या विकासाच्या त्यांच्याकडे काही निश्चित योजनाही आहेत.हे सारे करत असताना प्रसिध्दीपासून दूर राहण्याचा त्यांचा कटाक्ष लक्षात घेण्यासारखा आहे.ध्येयवादाच्या पोकळ गप्पा किंवा आपण काही फार वेगळे करत आहोत असा आव यांना इथे अजिबात वाव दिलेला दिसत नाही.स्वप्नाळू वृत्ती आणि व्यवहार यांची इथे अतिशय सुरेख जोडी जमली आहे असे त्यांच्याशी बोलताना सतत जाणवत राहते.

शाळेमध्ये मर्यादित साधन सामग्री असूनही तिचा अत्यंत कल्पकतेने उपयोग केलेला आहे.निधीअभावी शाळेत काही न्यून राहीले आहे असे घडू न देण्याची काळजी घेण्यात आली आहे.इथला नेटकेपणा ,वातावरणातील प्रसन्नता आणि सर्व कर्मचाऱ्यांचे जिव्हाळयाचे वागणे सतत स्मरणात रहावे असेच आहे.

आज घाईत असल्याने इथे फार वेळ थांबता आले नाही.तरी पुन्हा एकदा इथे यावे असे प्रकर्षाने वाटते पुन्हा पुन्हा इथे यावे असे वाटायला लावण्याचे सामर्थ्य या उपक्रमात निश्चितच आहे.या उपक्रमाच्या विकासाविषयी संस्थापकांच्या ज्या कल्पना आहेत त्यांना नजीकच्या भविष्यकाळात मूर्तरुप लाभेल असे निश्चितपणे वाटते.

त्यासाठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा!

**- मा.श्री.दिलीप ज्ञा.पांढरपट्टे**
**उप विभागीय अधिकारी (महसूल) तथा उप विभागीय दंडाधिकारी,दापोली.**

दिनांक - २०/०२/१९९०

आपल्या शाळेस योगायोगान भेट देण्याची संधी मिळाली व सर्व परिसर आणि मुलांना भेटता आले.मुलांसमोर काही स्वजीवनाच्या आठवणी सांगितल्या व काही कविताही वाचल्या.मुलांनी उत्तम सहभाग घेतला.शाळेचा एकूण वाढता पसारा व त्यामागची तळमळ पाहून धन्य झालो.एक वेगळे दर्शन घडले.आभारी आहे.

**- कै.मा.श्री.नारायण सुर्वे**
१२३३ सुभाषनगर,
शुक्रवार पेठ,
पुणे - ४११००२

दिनांक - ०१/०८/१९९०

आज लोकमान्य टिळक पुण्यतिथी व शाळेचा वर्धापनदिन असल्याने आयोजित वेळेला सभेस अध्यक्ष या नात्याने उपस्थित राहिलो.शाळेला वारंवार भेट घडते.दरवेळी शाळेची होत असलेली प्रगती विविध बदल तसेच नवनवीन उपक्रम पाहून आनंद वाटतो. आजही शाळेची नविन बांधकामे सुरु होण्याच्या मार्गावर दिसतात.ग्रंथालय बरेच समृध्द झाल्याचे दिसते. आज वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.कातळामध्ये झाडे वाढवण्याची जिद्द आणि उत्साह यांना दाद दिलीच पाहिजे.

**- मा.श्री.दिलिप पांढरपट्टे, उपविभागीय अधिकारी (महसूल) व दंडाधिकारी दापोली.**

दिनांक - ०१/०८/१९९०

लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथीनिमित्त येथे उपस्थित राहिलो. *Rural Education* ग्रामीण शिक्षण व त्याचा विकास हे जीवितध्येय मानून डॉ.दांडेकर पती - पत्नींनीं जो त्याग केला तो निश्चितचं प्रशंसनीय आहे.सुदैवाने कार्यकारी मंडळ व विश्वस्त यांचे स्वयंप्रेरीत सहकार्य हे सुध्दा तितकेच महनीय आहे. विशिष्ट पध्दतीने ग्रामीण विद्यालय स्वयंसिध्द व स्वयंनिर्भर करण्याचा प्रयत्न स्तुत्य आहे.शाळेची सर्वागिण प्रगती पाहून समाधान वाटले.वृक्षारोपण पर्यावरण अशा सारख्या महत्वाच्या गोष्टीकडे शाळा चालकांचे लक्ष आहे हे लक्षणीय आहे.प्रशालेला व संस्थेला सदिच्छा, शुभेच्छा! उत्कर्ष उतरोत्तर वर्धकाल होवो ही प्रार्थना.

**- मा.श्री.पां.वि.भावे माजी प्रशाला प्रमुख - दापोली.**

दिनांक - २८/०४/९१

चिखलगावच्या शाळेसंबंधी बरेच ऐकले होते ती पाहण्याचा योग यावा अशी इच्छाही होती.ती इच्छा आज पूर्ण झाली आणि लोकमान्य टिळकांच्या या पुण्यभूमीचे दर्शन घडले.फार आनंद झाला.माळावरची ही शाळा हळूहळू येथील जीवनात परिवर्तन घडवून आणील यात काही शंकाच नाही.डॉ.दांडेकर पतीपत्नी ज्या ध्येयवादाने यासाठी धडपडत आहेत तो पाहता हे परिवर्तन होईलच होईल.

**- मा.श्री.द.मा.मिरासदार**

दिनांक - २१.०२.०९

तुमच्या स्नेहसंमेलनासाठी पाहुणा म्हणून येणे

हा खरोखरच बहुमान आहे!

जग बदलायचं असेल, तर तो

परिवर्तनाचा मार्ग

शाळांमधून जातो......खरं ना?

त्यामुळं जगातले सगळे थोर तत्वज्ञ

अंतिमतः वळतात ते शिक्षणाकडं!

गोड गोड हे सारं वातावरण

मी आहे तुमच्यासोबत

अन् असेनही .....सदैव!

तुमच्यापैकीच एक, असं समजा मला!

तो माझा खरा सन्मान.

अभिनंदन. शुभेच्छा!

**- मा.श्री.संजय आवटे ( सहसंपादक, लोकसत्ता पुणे)**

दिनांक - १३/२/२०१०

रत्नागिरी जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना लोकमान्य टिळक विद्यामंदिर शाळेला भेट दिली. हे विद्यालय इतर शाळांपेक्षा आगळे वेगळे विद्यालय असल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका आदरणीय श्रीमती रेणू दांडेकर यांच्याशी प्रार्थनिय चर्चा होत असतांना जाणवले. शाळेचा तंत्र शिक्षण कक्ष पाहिला, वाचनालयाला भेट दिली या दोन्ही दालनांचा विद्यार्थी घडविण्यासाठी अतिशय प्रभाविपणे उपयोग होत असल्याचे जाणवले. विद्यार्थ्यांनी स्वकौशल्याने निर्माण केलेली दैनंदिन उपयोगाच्या वस्तु पाहिल्या त्यांच्या या निर्मितीने भारावून गेलो.

..जीवन जगायला शिकवते ते शिक्षण .. या पूज्य साने गुरुजींनी केलेल्या शिक्षणाच्या व्याख्येची प्रचिती या विद्यालयात अनुभवायला मिळाली.

जीवन जगायला शिकवणारी जीवन शिक्षण शाळा म्हणजे लोकमान्य टिळक विद्यामंदिर संस्थेला, शाळेला आणि ग्राम विकासाचे काम हाती घेतलेल्या दांडेकर दाम्पत्याला व त्यांच्या सहकाऱ्यांना हार्दिक शुभेच्छा!

**मा.श्री. भालचंद्र देसले,**
**(शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे.)**

दिनांक – २२/२/१०

खऱ्या अर्थाने एक आदर्श अध्ययन देणारी शाळा! ह्या प्रकल्पातून अनेक शाळांना नवीन प्रेरणा मिळेल.

**मा. डॉ. विजय भटकर ( ई टि एच रिसर्च लॅब)**